# मराठीतील स्त्रीवादी समीक्षा आणि स्त्रीवादी काव्य

## (Feminist reviews and feminist poetry in Marathi)

प्रा. डॉ. सौ. वीरा मांडवकर
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445401
E mail: veeramandavkar18@gmail.com भ्रमणध्वनी 9403014885

### गोषवारा :

जेव्हा स्त्रिया लिखाणातून स्वतःचे स्वत्व शोधण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांचे साहित्य पुरुषांच्या साहित्यापेक्षा वेगळे ठरते. स्त्रियांच्या कादंबऱ्यांतून, कथांतून, कवितांतून त्यांच्या स्वत्वाची जाणीव त्यांना कशी झाली, वर्षानुवर्षे आपण कसे दडपल्या गेलो याचे भान त्यांनी कसे व्यक्त केले, याचा शोध घेणारी समीक्षा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा होय. स्त्रीवादाच्या अनुषंगाने जाणाऱ्या व स्त्रीवादी अशा कविता या बाबतीत मराठीतील योगदान बेताचे आहे. आधुनिकपूर्व काव्यपरंपरेचा विचार केला तर असे लक्षात येते की कवयित्रींच्या सृजनाने दोन प्रकारच्या धारा निर्माण केल्या आहेत. एक धारा म्हणजे प्राचीन कवयित्रींच्या रचनांची व दुसरी धारा लोकसाहित्यातील मौखिक परंपरेच्या गीतांची. धार्मिक मार्गावर मार्गक्रमण करणाऱ्या संतकवयित्रींच्या काव्याचा अभ्यास केल्यास तत्कालीन मराठी स्त्रीवादाचे समाजशास्त्र व मानसशास्त्र यावर बराच प्रकाश पडू शकतो.

### Abstract:

When women try to find their own identity through writing, their literature differs from men's literature. A feminist review is a review that explores how women became aware of their identity through their novels, stories, and poems, and how they expressed their sense of oppression over the years. The contribution of Marathi in the field of feminist poetry is invaluable. Considering the pre-modern poetic tradition, it can be seen that the creation of poets has created two types of streams. One is the works of ancient poets and the other is the songs of the oral tradition in folklore. If we study the poetry of the saintly poets who follow the religious path, we can shed a lot of light on the sociology and psychology of the then Marathi feminism.

### बीजशब्द :

स्त्रीसाहित्य, स्वत्त्व, स्त्रीवाद, समीक्षा, स्त्रीकवयित्री, भक्ती, आत्मभान, स्वातंत्र्य

### प्रस्तावना :

स्वतःच्या वेगळेपणाची स्वत्वाची जाणीव ही आजच्या काळातल्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाची व केंद्रीय संकल्पना आहे. ही स्वत्वाची जाणीव दुहेरी असते. स्वतःचे इतरांशी असणारे नाते सारखेपणा आणि इतरांहून असणारे वेगळेपण या दोन्हींचाही तीत समावेश होतो. स्त्रियांना ही स्वत्वाची जाणीव नसते किंवा जी असते ती गमावण्यासाठीच असते. किंबहुना कॅरोलिन जी. हिलब्रान म्हणते त्याप्रमाणे पत्नीत्वासाठी स्वचा त्याग ही किंमत द्यावी लागते. जेव्हा स्त्रिया लिखाणातून स्वतःचे हे स्वत्व शोधण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा त्यांचे साहित्य पुरुषांच्या साहित्यातून वेगळे ठरते. स्त्रियांच्या साहित्यातील हा वेगळेपणा शोधून त्याची चिकित्सा करण्याचे कार्य गेल्या काही वर्षात काही स्त्री समीक्षकांनी केले आहे. स्त्रियांच्या कादंबऱ्यांतून, कथांतून, कवितांतून त्यांच्या स्वत्वाचा शोध त्यांनी कसा घेतला. त्याची जाणीव त्यांना कशी झाली आहे वर्षानुवर्षे आपण कसे दडपल्या गेलो याचे भान त्यांनी कसे व्यक्त केले, याचा शोध घेणारी समीक्षा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा होय.

## विषय विवेचन :

स्त्रीवादी साहित्य या संकल्पनेचा उदय आणि स्त्रीवादी समीक्षेचा उदय या दोन्ही गोष्टी स्त्रीमुक्ती चळवळीशी निगडीत आहे. जगाच्या लोकसंख्येच्या निम्म्या लोकसंख्येच्या वर्चस्वातून दुसऱ्या निम्म्या भागाची सोडवणूक करण्यासाठी चाललेला हा संघर्ष शतकानुशतके सुरू असला तरी गेल्या काही वर्षात त्याने एक व्यापक व सर्वंकष रूप धारण केले आहे. 'पाश्चात्य देशात स्त्रीमुक्ती चळवळ वेगाने फोफावत गेली. तिचाच एक भाग असलेली स्त्रीवादी साहित्यसमीक्षा वेगवेगळ्याा गोष्टींवर भर देत विकसित झाली. इंग्रजी स्त्रीवादी समीक्षेने स्त्रियांच्या शोषणावर भर देऊन मार्क्सवादी दृष्टिकोन स्वीकारला. फ्रेंच स्त्रीवादी समीक्षेने विरचनावादी पद्धती स्वीकारून भाषेचा शोध घेतला. तसेच मानसशास्त्रीय बाजूने या साहित्यातून उमटणाऱ्या मानसिक कुचंबणेवर भर दिला. अमेरिकन स्त्रीवादी समीक्षेने पाठ्यनिष्ठ पद्धत स्वीकारून आविष्काराचा शोध घेतला.'[1] जिला स्त्रीमुक्ती चळवळ म्हणतात तिची सुरुवात सिमॉन द बुव्हा ने लिहिलेल्या 'द सेकंड सेक्स' (1949) या पुस्तकापासून सुरू झाली असे मानायला हरकत नाही. त्यांच्या मते पुरुषांच्या साहित्यात स्त्रीचे यथायोग्य चित्रण असूच शकत नाही. कारण पुरुषांनी निर्मिलेल्या व निश्चित केलेल्या ठराविक मिथचे नमुनेच त्यांनी रंगवलेले असतात. पुरुषांच्या साहित्यातून दिसणारी स्त्री चुकीची, विपर्यस्त स्वरूपाची असते, तिचे चित्रण खोटे असते. स्त्रीची प्रतिमासृष्टी, भाषा, शैली भिन्न असते. पुरुष आणि स्त्रियांच्या अनुभवात सरळ स्वच्छ असा भेद असतो. काही अनुभव तर पुरुष कितीही संवेदनशील असला तरीही यथार्थपणे त्यांचे वर्णन करू शकत नाही. उदाहरणार्थ बलात्कारीत स्त्रीची मानसिकता, गरोदरपणाचा अनुभव, मातृत्वाची भावना, मुलीची सासरी जाताना होणारी घालमेल असे अनेक अनुभव पुरुषांच्या अनुभवकक्षेच्या बाहेर असतात. म्हणूनच स्त्रीवादी समीक्षा ही लिंगभावाच्या वेगळ्या जाणीवेने होणे आवश्यक आहे.

## स्त्रीवादी काव्य समीक्षा :

मराठी स्त्रियांचे साहित्य या विषयावर चर्चा करायची झाल्यास त्यात मराठीतील स्त्रीवादी काव्याचा विचार करणे गरजेचे ठरेल. अर्थात यावर आक्षेप म्हणजे स्त्रीवादाच्या अनुषंगाने जाणाऱ्या व स्त्रीवादी अशा कविता या बाबतीत मराठीतील योगदान बेताचे आहे. तरीही स्त्रीवाद व स्त्रीवादी काव्य यांची मीमांसा केल्यास या वेगळ्याा विश्वाची मराठी साहित्याला नक्कीच ओळख होईल. मराठी स्त्रीकाव्य प्राधान्याने स्त्रीलक्ष्यी आहे. तसेच स्त्रीवादासंबंधीच्या आपल्या कल्पना काहीशा अमेरिकेच्या प्रभावाखाली आहे. स्त्रीचे सर्वंकष शोषण व्यक्त करणारी, तिचे घडून आलेले किंवा घडविलेले व्यक्तित्वशून्य व्यक्तीरूप, पुरुषसत्ताक राजवटीत आमरण कोंडीत सापडलेले तिचे जिणे, स्त्रीच्या गौरवाचा फसवा डाव व त्यातून निर्माण झालेले मिथकांचे डोंगर यासारखे अनेक गुन्हे स्त्रीवादाने पुरुषसत्ताक राजकारणावर लावले आहे. या जाणिवांतून व्यक्त झालेले स्त्रीवादी काव्य अभ्यासताना अनेक विचारप्रवाह त्यात दिसून येतात.

## भक्तीच्या अनुषंगाने स्त्रियांचे सृजन :

आधुनिकपूर्व काव्यपरंपरेचा विचार केला तर असे लक्षात येते की कवयित्रींच्या सृजनाने दोन प्रकारच्या धारा निर्माण केल्या आहेत. एक धारा म्हणजे प्राचीन कवयित्रींच्या रचनांची व दुसरी धारा लोकसाहित्यातील मौखिक परंपरेच्या गीतांची. यात एक वैशिष्ट्य ठळकपणे लक्षात येते, ते म्हणजे आधुनिक काळात स्त्रियांना लेखनक्षेत्रात सुलभ प्रवेश नव्हता. पण प्राचीन विशेषतः सांप्रदायिक कवयित्रींना अशी कुठलीही अडचण आली नाही. महदंबा, मुक्ताई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई, वेणाबाई, बयाबाई यांसारख्या भिन्न भिन्न सामाजिक परिस्थितीतून आलेल्या स्त्री कवयित्रींनी मध्ययुगीन भक्तीमार्गाच्या आधाराने अंतर्मुक्तपणे आविष्कार केला आहे. प्राचीन कवयित्रींनी पंडिती काव्यात किंवा शाहिरी काव्यात मात्र कामगिरी पार पाडल्याचे दिसत नाही. भक्तीमार्गातील स्त्रियांचा अधिकार मात्र सर्वमान्य आहे. तथापि भक्तीमार्गाच्या बाहेरील पंडितांच्या अभिजनवर्गात आणि सामान्यजनांच्या बहुजनवर्गात स्त्रियांच्या लेखनाला तितकीशी मान्यता मिळालेली दिसत नाही. अगदी 19 व्या शतकाच्या अखेरीपर्यंत अशीच स्थिती आहे. भक्तीमार्गाने निदान धार्मिक क्षेत्रात लोकशाहीची काही मूल्ये रूजविली. याचा फायदा तत्कालीन कवयित्रींनी उचलला. त्यातील पंथांच्या आद्यपर्वातील स्त्रियांचा सहभाग, प्रतिष्ठा व लेखन हा स्त्रीवादी चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आद्य मराठी टप्पा आहे.

धार्मिक मार्गावर मार्गक्रमण करणाऱ्या संतकवयित्रींच्या काव्याचा अभ्यास केल्यास तत्कालीन मराठी स्त्रीवादाचे समाजशास्त्र व मानसशास्त्र यावर बराच प्रकाश पडू शकतो. 'महाराष्ट्रात स्त्रिया दळणकांडण करताना ओवी म्हणतात असे 'मानसोल्लास' अथवा 'अभिलषितार्थचिंतामणी' (इ.स. 1929) या ग्रंथात म्हटलेले आहे. महाराष्ट्रातल्या कवींनी या छंदात रचना करण्यापूर्वी ती घराघरातल्या सर्वसामान्य स्त्रीपुरुषांना परिचित होती.'[2]

आधुनिकपूर्व स्त्रीसाहित्य जरी दळण व जाते या परिघात फिरत असले तरीही घरातल्या अशा सांदीकोपऱ्यांमध्ये जो त्यांनी उजेड पसरला, तो त्यांच्या स्वतःच्या मुक्त प्रतिभेचा होता. त्यांचे हे रचनाविश्व त्यांच्या निखळ लौकिक जिण्याचे निदर्शक आहे. प्राचीन मराठीतील अज्ञात पंडिती कवयित्रींना जो हक्क कधी लाभलाच नाही, आणि भक्तीमार्गी कवयित्रींना भक्तीमार्गाच्याच कक्षेतच जो हक्क मराठी कवयित्रींना दळण जात्याच्या, तुळशीवृंदावनाच्या आधारे लाभला. परंतु या मर्यादेत मात्र त्यांना मुक्त स्वातंत्र्य होते. स्त्रीचे परावलंबित्व, व्यथावेदना, पुरुषी किंवा दैवी कृपेने लाभणाऱ्या दुर्मिळ सुखक्षणांची अभिव्यक्ती म्हणूनच त्या निःशंकपणे करू शकल्या. या रचनांतून स्त्रीवादी विद्रोहाचे सौम्य सूचक प्रकटनही त्यांनी केले. उपरोध, उपहास, विनोदबुद्धी यांचा वापर करून मनातील खदखद व्यक्त करण्याचा त्यांनी योग्य मार्ग स्वीकारला. मात्र लोकसाहित्याचे जे मुख्य वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे अनामिकता. ही अनामिकता स्वाभाविक होती की लादलेली हा वादाचा मुद्दा आहे. लोकसाहित्याची ही परंपरा सांस्कृतिक वर्चस्वातून निर्माण झाली होती असे म्हणावे लागेल. लोककवयित्रींच्या रचना त्यांच्या समकालीन भक्तीमार्गी कवयित्रींच्या रचनांप्रमाणे भूर्जपत्रावर का होईना, त्यांच्या नावागावासकट का प्रविष्ट होऊ शकले नाही ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

## स्त्रीवादी पुनर्मूल्यांकन :

आधुनिक स्त्रीवादाचा रोख पुरुषप्रधान पूर्वपरंपरेचे भेदक संशोधन व पुनर्मूल्यांकन करण्यावर आहे. यासाठी पूर्वपरंपरेतील पौरुषेय साहित्य व अपौरुषेय म्हणजे स्त्री साहित्य याची सांस्कृतिक वा वाङ्मयीन समीक्षा उपलब्ध सर्व साधनांनी व पद्धतींनी करणे आवश्यक ठरते. हा काहीसा विरचनावादी दृष्टिकोन आहे. या दृष्टीने सगळेच प्राचीन साहित्य स्त्रीवादी क्ष–किरणांनी तपासाण्याची गरज आहे.

## विसाव्या शतकातील स्त्री काव्य :

स्त्रीचे विसाव्या शतकाच्या सुरुवातीचे रूप पाहिले तर ती कशी दिसते, तर प्रापंचिक सुखदुःखांना सामोरी जाणारी, गीत व गाणे यांतून विरंगुळा व हौस शोधणारी, लेखनापुरती उसंत व स्वातंत्र्य लाभलेली अशी एक कवयित्री सामान्यतः पांढरपेशा वर्गातील अल्पसंतुष्ट अशी दिसते. अशा स्त्रीचे दर्शन आपल्याला सुरुवातीला 'स्त्रीगीत रत्नाकरा'च्या पार्वतीबाई गोखल्यांच्या रूपात होते. साधारणतः इ.स. 1903 चा हा काळ. त्यानंतर 'अंतगृहातील गीते', लिहिणाऱ्या सरस्वती टिपणीस, 'यमुनातरंग'च्या कर्त्या यमुना नागपूरकर, 'प्रेमोद्‌गार' कर्त्या अन्नपूर्णा दीक्षित, 'गीतद्विदल' रचणाऱ्या कमलताई देशपांडे इ. परंपरेतील काही आरंभीच्या कवयित्री. या परंपरेचा एक परिणत आविष्कार लक्ष्मीबाईंच्या 'घागर' या काव्यसंग्रहात झाल्याचे दिसते. घागर ही प्रतिमा किंवा प्रतीक या परंपरेतील मानुषी कवितेचे एक अर्थपूर्ण भाष्य म्हणता येईल. ही परंपरा विसाव्या शतकातील स्त्रीकाव्याचे एक स्थायी स्वरूप अधोरेखित करणारी आहे. सांसारिक, प्रापंचिक अनुभव, त्या अनुभवांना संसारपूर्व अनुभवांनी वा जाणिवांनी दिलेली आंदोलने, त्यातून जाणवणारी स्वप्ने व स्वप्नभंग यांचे ताणतणाव असे काहीसे त्या स्थायी स्वरूपाचे तपशील सांगता येतील. उत्तरोत्तर याच परंपरेत प्रापंचिक जगाची बाह्य रूपे, प्रतिके, प्रतिमा, यांत बदल होत गेला. तरी जाणिवाच्या गाभ्याचे स्वरूप प्राधान्याने स्वीकारशील सहनशील स्त्रीत्वाचेच राहिले. 'स्त्रीवादी कवयित्री' या भूमिकेचे शक्तीशाली भान त्यात अभावाने आढळते. स्त्रीच्या मुक्तीचे, शक्तीचे व पर्यायी व्यवस्थानिर्मितीचे स्त्रीवादी आत्मभान या परंपरेत नाही असे सामान्यपणे म्हणता येईल.

## बहिणाबाई चौधरींचा प्राकृतिक स्त्रीवाद :

1952 मध्ये बहिणाबाई चौधरींच्या कवितांचे संपादित पुस्तक प्रसिद्ध झाले. बहिणाबाईंची प्रतिभा एका अस्सल भूमिकन्येचे दर्शन घडवणारी आहे. त्यांच्या कवितांमधील स्त्रीमन अधिक मुक्त, अधिक निर्भय आहे. सृष्टीचक्रातील स्त्रीपुरुष नात्याचे निखळ प्राकृतिक आत्मभान त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. या प्राकृतिक आत्मभानात स्त्री पुरुषातील समानता व परस्परपूरकता ठामपणे गृहीत धरलेली आहे. म्हणूनच आधुनिक मराठीतील स्त्रीवादी काव्याच्या वाटचालीत बहिणाबाईंच्या काव्याला खास अभ्यासनीयता व प्रस्तुतता आहे. स्त्रीपुरुष नात्यातील नैसर्गिक, जैविक नैतिक असा जो सनातन गाभा संभवतो. तोच बहिणाबाईंच्या रचनेचा पायाभूत घटक आहे. स्त्रीवादाच्या अंतिम आणि समग्र प्रतिमानात पुरुषवर्गाला वगळून चालणार नाही. व हे खरे असेल तर बहिणाबाईंचा काहीसा संस्कृतिसुसंगत नव्हे पण प्रकृतिसुसंगत स्त्रीवादी आविष्कार विचारणीय ठरतो. तथापि बहिणाबाईंना तशी समर्थ परंपरा नंतरच्या कवितेत सापडली नाही. हेही तितकेच खरे आहे. स्त्रीचे व्यक्तीमूल्य आणि

समष्टीमूल्य यांचा सुसंवादी मेळ नैसर्गिक जैविक नैतिकतेच्या आधारे पुरुषवर्गाशी घालू पाहणारा स्त्रीवाद असे काहीसे बहिणाबाईंच्या भूमिकेसंबंधी म्हणता येईल.

## महदंबा, मुक्ताई, जनाई व बहिणाई यांचे योगदान :

बहिणाबाईंच्या या आधुनिक टप्प्यावरून थोडेसे मागे वळून पाहिले तर महदंबेचे धवळे, मुक्ताईंचे ताटीचे अभंग, जनाबाईची रचना आणि तुकोबा शिष्या बहिणाबाईंची संतकृपेची साकारलेली वास्तू या रचनांची एक मराठी स्त्रीवादी लक्षणीयता लक्षात येते. सामान्यपणे या संतप्रभावाळीतील सगळ्याच स्त्रीकाव्याने भक्तीमार्गाच्या कक्षेत राहूनही त्याचे लौकिकीकरण करण्याचा प्रयत्न केला. देवाचे व देवत्वाचे लौकिकीकरण करण्याचे मोठे श्रेय या प्राचीन कवयित्रींना दिले पाहिजे. यात जनाबाई अव्वल क्रमांकावर आहे यात शंकाच नाही. देवदेवत्वाचे ऐहिकीकरण ही स्त्रीजीवनाच्या वास्तव चित्रणाची एक नामी स्त्रीवादी क्लृप्ती होती किंवा रणनीती होती असे म्हणता येईल. जणू काही देवदेवत्वाच्या मिषाने या कवयित्रींनी समस्त पुरुषवर्गालाच धारेवर धरले. या कवयित्रींच्या सर्जनशील आत्मभानाची निकड म्हणूनच त्यांनी देवदेवतांचे निखालस मानुषीकरण घडवून आणले. राधेची प्रतिमा किंवा एकूणच प्राचीन मराठी साहित्यातून निर्माण झालेली राधा ही मराठी स्त्रीवादाच्या जडणघडणीत मोठी मोक्याची प्रतिमा आहे. पुन्हा पौरुषेय साहित्यातील राधा आणि स्त्रियांच्या रचनांतील राधा यांचा सूक्ष्मपणे तौलनिक अभ्यास केल्यास स्त्रीवादाच्या मांडणीस तो अत्यंत उपकारक ठरेल, असे वाटते. राधाकृष्ण नाते हे पुरुषसत्ताक व्यवस्थेतील स्त्रीमुक्ती व स्त्रीशक्ती या दोहोंचे एक अभ्यसनीय प्रतिमान आहे, असे वाटत राहते. राधेप्रमाणेच मीरेचे प्रतिमानही असेच अभ्यसनीय आहे.

मुक्ताबाईंचे ताटीचे अभंग हे एक अनन्यसाधारण स्त्रीउत्सर्जन आहे. बहुधा जगातील वाङ्मयातही त्याला तोड नसावी. स्त्रीचा असाधारण आत्मप्रत्यय आणि पुरुषी कर्तृत्वाच्या चेतनेची त्यातील शक्ती यांचा हा भावोत्कट, वास्तव व तत्वगर्भ आविष्कार आहे. डॉ. सदानंद मोरे म्हणतात त्याप्रमाणे भगवंताच्या गीतेइतकेच या मुक्ताईंच्या गीतेचे महत्व आहे. मुक्ताईने चांगदेवालाही दीक्षा दिली. स्त्रीपुरुष नात्यांमधील नैसर्गिक नैतिक मूल्यांचे भान मराठीत तरी पुरुषांपेक्षा अधिक प्रभावीपणे कवयित्रींनी व्यक्त केल्याचे दिसते.

भागवत संप्रदायाला एका देवालयाचे रूप देणाऱ्या संत बहिणाबाई. भागवत संप्रदायाच्या समस्त संतकवींच्या कर्तृत्वाला एका प्रतिमेत बांधून पवित्र असा साक्षात्कार घडविणाऱ्या बहिणाबाई म्हणजे स्त्रीवर्गाच्या मानसिकतेचे दर्शन होय. स्त्रीवर्गाचा सामुहिक नेणिवेचा घराचा आदिबंध हा नेहमीच मंदिराच्या देवालयाच्या रूपाने साकारलेला असतो. ताटीचे अभंग किंवा बहिणाबाईंची संतककृपेची इमारत या दोहोंतून स्त्रीच्या सांस्कृतिक भानाचे व मूल्यदृष्टीचे नमुनेदार दर्शन घडते, त्या प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखीत केले पाहिजे. संतपणाची एक व्यापक उदास संकल्पना मुक्ताबाई विशद करून जातात. त्या संकल्पनेला अन्यत्र कुठेच तुलना नाही. आधुनिक मराठी स्त्रीवादाच्या दृष्टीने या दोघींची सांस्कृतिक गोवणुकीची क्षमता व वृत्ती यांना खूपच अर्थ आहे. स्त्रीच्या नैसर्गिक हक्कांची व कर्तव्यांची आणि स्त्रीपुरुष नात्यातील तशाच नैतिकतेची जाणीव आधुनिक बहिणाबाईंच्या निकोप रचनांतून व्यक्त झाली आहे.

## 1980 नंतरचे काव्य :

विसाव्या शतकातील स्त्रीकाव्याचा स्त्रीवादी दृष्टीने मागोवा घेताना साधारणपणे 1980 पूर्वीचे स्त्रीकाव्य व 1980 नंतरचे स्त्रीकाव्य अशी स्थूलमानाने विभागणी करता येईल. स्त्रीवादी भूमिकेचे काहीसे सुस्पष्ट भान 1980 नंतरचे ज्यांचे काव्यसंग्रह आहेत त्या कवयित्रींमध्ये दिसून येते. अर्थात प्रकटपणे स्वतःला स्त्रीवादी म्हणवून घेणाऱ्या स्त्रिया दोनचार अपवाद वगळता फार नाहीत. रजनी परूळेकर, मल्लिका अमरशेख, अश्विनी धोंगडे, नीरजा इत्यादींची नावे या अपवादभूत कवयित्रींमध्ये घेता येईल. हिरा बनसोडे, प्रज्ञा लोखंडे याही स्त्रीवादाच्या बाजूच्या फिर्यादी कवयित्री आहेत. तथापि त्यांच्या फिर्यादीला दलितत्वाच्या विद्रोहाची बाजू आहे. खरे तर 1980 नंतरच्या काळातील प्रत्येक कवयित्री ही निसर्गतःच स्त्रीवादी आहे असे सामान्यपणे म्हणता येईल. अर्थात त्यांच्या स्त्रीवादी जाणिवांना पुरुषसत्ताक व्यवस्था व मूल्यांना समग्रपणे नकार देणारे, दाहक विद्रोह व्यक्त करणारे क्रांतिकारक तीव्र स्वर लाभलेले नाहीज. स्त्रीपरुष नात्यातील अन्याचय विषमता, स्त्रीचे शोषण, तिची परवशता व पराभूतता यासंबंधीचे भावानुभाव हेच त्यांच्या रचनांचे आधार आहेत. त्याच्या स्त्रीवादी जाणिवा आक्रमक नसून प्रतिकारात्मक अधिक आहेत. स्त्रीत्वाचे भान जपणारी आधुनिक कविता लिहिणाऱ्या कवयित्रींमध्ये आता भर पडतेच आहे. आजच्या युगातील योगिनी, अस्मिता गुरव, कल्पना दुधाळ, शशी डंभारे, सुनीता उबाळे, पल्लवी चौधरी, रेणुका खोत, संध्या रंगाही, नेहा भांडारकर यांच्या कविता रोमँटिकतचे आवरण खेचून घेत आत्मशोधाच्या वाटेने निघालेल्या आहेत. स्वतःला पुरुष या पारंपरिक केंद्रापासून बाजूला काढत आपल्या जगण्याची कविता लिहिली. अनुराधा पाटील यांच्या कवितेत नात्यांची कोवळीक दिसते. प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेत

ऐतिहासिक दृष्टीचे भान असलेली स्त्री दिसते. कविता महाजन यांच्या कवितेतून नोकर मालक व्यवस्थेची कडवटपणे होणारी मांडणी दिसते. संध्या रंगारी, प्रतिभा अहिरे, उषाकिरण आत्राम अशा अनेक कवयित्रींच्या कवितांतून नव्या स्वतंत्र मोकळ्या समान मूल्याधारित अवकाशाची मागणी पुढे येताना दिसते. सुनीता झाडे या कवयित्रीची कविता कमी प्रमाणात असली तरी अतिशय ताकदीने त्यांची कविता व्यक्त होताना दिसते. कॉमनवुमन आत्ममग्न या काव्यसंग्रहातून भोवतालच्या हेलावून टाकणाऱ्या गोष्टी प्रकट होतात. पद्मरेखा धनकर काव्याद्वारे नव्या जगाशी संवाद साधतात. 'तिचा झगडा 'स्व'शी आहे. आणि हीच तिची जमेची बाजू आहे. ती कविता फक्त लिहित नाही तर ती आपल्या कवितेला सांभाळते, कविता जगते. स्वतःच्याच कवितेशी सतत तिचा संवाद चाललेला असतो. आपल्या कवितेची आपल्या सामर्थ्याची तिला पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच ती आपल्या कवितेत तोलून मापून शब्द वापरते.'[3]

## 1980 पर्यंतच्या काव्याचे विशेष :

1980 पूर्वीच्या आघाडीच्या कवयित्रींमध्ये संजीवनी मराठे, इंदिरा संत, शांता शेळके, पद्मा गोळे, अनुराधा पोतदार, शिरीष पै इत्यादींचा समावेश आहे. मात्र या कवयित्रींसोबतच वाटचाल करणाऱ्या 1980 पूर्व स्त्रीरचनाकारांची संख्या मोठी आहे. स्त्रीवादाच्या दृष्टीने पाहता 1980 पूर्व स्त्रीकाव्याची काही वैशिष्ट्ये थोडक्यात नमूद करता येतील. पहिले म्हणजे या स्त्री काव्यातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्वमूल्य कटाक्षाने जपण्यात आले. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते, ते मोलाचे असते, पुरुषाप्रमाणे तिच्यात मौलिक सर्जनशीलता असते इ. गोष्टी या स्त्रीकाव्याने निर्विवाद प्रस्थापित केल्या व समाजाकडून त्यास अधिमान्यताही मिळाली. ही मानुषी कविता प्राधान्याने 'मी'ची कविता आहे. 'आम्ही' ची नाही. दुसरे म्हणजे हे स्त्रीकाव्य पुन्हा प्राधान्यानेच कळत नकळत समकालीन पुरुष कवींच्या प्रतिमानाला अनुसरणारे आहे. प्राचीन कवयित्रींच्या निर्मितीची जी परंपरा आहे तिच्यातील सत्वधारांकडे ही कविता वळल्याचे दिसत नाही. तिसरी बाब म्हणजे 1980 पूर्वीची ही स्त्रीरचना सामान्यपणे पांढरपेशा, मध्यमवर्गीय वर्गातील स्त्रियांनी केली आहे. चौथी गोष्ट लोकवाङ्मयातील लोककवयित्रींच्या काही शैलीविशेषांचे अनुकरण या स्त्रीकाव्यात असले, तरी त्यात स्वाभाविकपणे उमटलेला स्त्रीसमष्टीचा अंतर्नाद प्रतीत होत नाही. कवयित्रीपणाच्या भूमिकेवरील उघड व छुपे असे सामाजिक सांस्कृतिक निर्बंध पूर्णपणे झुगारून देण्याचे एक ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य या कवयित्रींनी घेतले यात शंका नाही. पाचवे वैशिष्ट्य म्हणजे ही कविता स्त्रीवादी परिवर्तनाच्या प्रेरणांपासून तशी अलिप्त आहे. पुरुष वर्गाबद्दलचे तिचे अभिप्राय प्राधान्याने व्यक्तिगत पातळीवर अर्थपूर्ण असणारे वा ठरणारे आहेत. स्त्रीवादी राजकारणाच्या युक्तिवादापासूनही ही मानुषी कविता अलिप्त आहे. 'शेला', 'राका', 'संसार', 'वर्षा', 'मंझधार' या शीर्षकांवरून लक्षात येते की या काळातील काव्यधारा स्त्रीवादाच्या आव्हानापासून फार खूप दूर होते. सामान्यपणे असे म्हणता येईल की स्वच्छंदवादाचा प्रभाव या काव्यावर अधिक आहे. स्त्रीजीवनाच्या अस्तित्वाचे व परंपरेचे तीव्र प्रखर भान वास्तवता व चिंतनशीलता यांच्या बळावर येऊ शकते.

## 1980 नंतरचे वास्तव व स्त्रीप्रतिमेचा दुहेरी पेच :

1980 नंतरच्या कालखंडातील स्त्रीकाव्याचे स्त्रीवादी जाणिवांच्या दृष्टीने उद्बोधक ठरणारे एक अभ्यसनीय अंग आहेच. खरे तर या कालखंडातील सर्वच कवयित्री स्त्रीमुक्तीच्या व स्त्रीशक्तीच्या पुरस्कर्त्या व प्रतिपादक आहेत. पुरुषसत्ताक व्यवस्था व परंपरा यांनी ग्रासलेल्या घरादारातील स्त्रीजीवनाची त्यांना प्रत्यक्षपणे कल्पना आहे. या दोन दशकांत वेगाने वाढत गेलेल्या स्त्रियांच्या चळवळी, संस्था, संघटना, उपक्रम, नियतकालिके, प्रचारसाहित्य, विद्यापीठीय स्त्री अभ्यास केंद्रे, प्रमुख प्रसारमाध्यमांनी स्त्रीसमस्यांना दिलेली नित्य नैमित्तिक जागा, राजकीय सत्तेत स्त्रीच्या सहभागासाठी प्रस्तावित केलेली राखीव जागांची तरतूद, शिक्षणक्रमात दिलेला स्त्रीजीवनदर्शनावरील भर, स्त्रीशिक्षणाच्या खास सोयी सवलती आणि स्त्रीच्या कर्तृत्वशाली पूर्वपरंपरेसंबंधी विविध पद्धतींनी केले जाणारे सामाजिक प्रबोधन यांसारख्या अनेक गोष्टींचा प्रभाव या कालखंडातील सर्जनशील स्त्रीमनावर आहे. स्त्रीचे घराच्या सांदीकोपऱ्यात पडलेले व्यक्तिमूल्य एका व्यापक परिप्रेक्ष्यात स्थानांतरीत करण्याचे श्रेय या कालखंडाला दिले पाहिजे. स्त्रीच्या या विकसनशील व्यक्तिगत व सांस्कृतिक प्रतिमानाचं कमीअधिक भान सगळ्याच कवयित्रींना आलेले आहे.

या कालखंडात स्त्रियांवरील व्यक्तिगत व सामूहिक अत्याचार, ताराबाई शिंद्यांच्या भाषेतील 'स्त्रीच्या मोहनी रूपाचे बाजारीकरण' व व्यापारी प्रदर्शन, नवनव्या कार्यक्षेत्रांत प्रविष्ट झालेल्या स्त्रियांचे छुपे व उघड लैंगिक शोषण, स्त्रियांच्या सामाजिक भूमिकांना व अधिकारांना होणारा छुपा पुरुषी प्रतिरोध यांसारखे प्रश्न पुढे आले व प्रसारमाध्यमांनी त्यांचा सर्वदूर बोलबाला केला. या नव्या मानुषी वास्तवाचे स्त्रीवादी विश्लेषण पुरेशा ताकदीने मराठीत होत असल्याचे दिसत नाही. स्त्रीकाव्यात या वास्तवाचे चित्र उमटते, ते जळजळीत उत्कट निषेधाचे. त्यात पुरुषी वर्चस्वाला निरूत्तर करणारे युक्तीवाद आहेत. पण तेही निषेधाच्या वळणाचेच. स्त्रीवादी प्रणालीचे काहीसे मवाळ स्वरूप त्यातून जाणवते.

## मिथकदृष्टी :

मिथकांचे तसेच इतिहास पुराणंतील पारंपरिक कथांचे स्त्रीवादी पुनर्मूल्यांकन करण्याचे प्रकट भान 1980 नंतरच्या स्त्रीकाव्यातून जाणवते. मात्र ते चिंतनीय आहे. असे दिसते की साधारणपणे परंपरागत मिथकांचा रूढ साचा व गाभा या कवयित्री जशाचा तसाच स्वीकारतात व त्यातून नवे युक्तिवाद सादर करतात. 'सावित्री, बाई पुन्हा एकदा येऊन जा'. असे आवाहन नीरजा करते. (वेणा – पृष्ठ 49), तर 'शंबूका, मी वाट पहातेय' असा सांगावा प्रज्ञा लोखंडे देते. जानकी, उर्मिला, द्रौपदी, राधा, मीरा, शर्मिष्ठा, यशोधरा, कन्याकुमारी, पार्वती यांच्या प्रतिमांकनातही हीच दृष्टी दिसून येते. मिथके व इतिहासपुरणकथा यांना मुळातच समग्रपणे आव्हान देण्याची व त्यामागील पुरुषसत्ताक डावपेचांना उघड करण्याची धारदार बौद्धिकता या मिथककाव्यातून आढळत नाही. यामागे काही कारणे आहेतच तथापि अवघी मिथक परंपराच शंकास्पद करण्याचा आत्मप्रत्यय या कवयित्रींमध्ये खूपच क्षीण आहे. या मिथककाव्याचे स्वरूप प्राधान्याने कल्पक युक्तिवादाच्या दृष्टीने ते काव्यात काहीसे संभ्रमित अवस्थेतील आहे. मर्मभेदक वैचारिकतेचा वसा घेतल्याखेरीज मिथककाव्या स्त्रीवादाच्या लख्ख उजेडात येऊ शकणार नाही असे वाटते.

## स्त्रीवादी प्रतिमा व प्रतिके :

प्रभावशाली स्त्रीवादी प्रतिमा वा प्रतीके निर्माण करण्यातही 1980 नंतरची स्त्री कविता पुरेशी मजल गाठू शकलेली नाही असे वाटते. 'विवर्त' (प्रभा गणोरकर), 'रक्तकमळांचे रान' (शैला सायनकर), 'दर्शनबिंदू' (आसावरी काकडे), 'तेजस्वला' (ज्योत्स्ना चांदगुडे) यांसारख्या काही अर्थपूर्ण प्रतिमा स्त्रीजीवनाची परवड साठवून ठेवणाऱ्या आहेत. मात्र एकूण मनुष्यसंस्कृतीसंबंधीचे रचनात्मक असे स्त्रीवादी ऐतिहासिक भान हे स्त्रीवादी काव्याचे अधिष्ठान होय. या बाबतीत स्त्रीवादी कविता फार कमी पडते असे वाटते. कदाचित विविध प्रकारच्या सामाजिक वर्गांतून व स्तरांतून पुढे आलेल्या या कालखंडातील कवयित्री अखेर एका विस्तृत झालेल्या पण मध्यमवर्गीय कक्षेतच अडकून पडलेल्या असाव्यात. ही कोंडी सामाजिक कार्यकर्त्या वर्गातूनच झालेल्या वा येणाऱ्या कवयित्रींकडून फोडली जाईल, असे वाटते.

त्यातही काही दिलासादायक आशाकिरण दिसतात. जसे मल्लिका अमरशेख यांची 'अश्वारूढ योद्धा' ही प्रतिमा येथे आठवते. स्त्रीवादाचे निशाण या लढाऊ पावित्र्यातील अश्वारूढ स्त्रीच्या खांद्यावर आहे. स्त्रीवादी ऐतिहासिकतेचे भान या प्रतिमेतून फार प्रभावीपणे व वास्तव दृष्टीने सूचित झाले आहे. या प्रकारच्या सखोल ऐतिहासिक भानाच्या विकसनावरच उद्याच्या स्त्रीवादी काव्याचे यश अवलंबून आहे.

यावरून असे लक्षात येते की स्त्रीवाद हा एक नखशिखान्त संघर्षशील विचारव्यूह आहे. एक राजकारण आहे. सुखेनैव व स्वेच्छ चिंतनमननाचा व आविष्काराचा तो विचारव्यूह नाही. या स्त्रीवादाचा उदय मनुष्य संस्कृतीच्या वाटचालीतील एक अपरिहार्य ऐतिहासिकतेमधून झाला आहे. म्हणून तो मराठी समाज व सर्जनशीलता यांना टाळता येणार नाही. आजवरच्या पुरुषसत्ताक प्रदीर्घ परंपरेतच प्रबळ व्यक्तिमत्त्वाच्या आधुनिक कर्तृत्ववान स्त्रियांनी रूढ चाकोरीबाहेर पडून आपले स्वत्त्व प्रस्थापित केले. अशा स्त्रियांच्या प्रतिमानांचा चिकित्सक पाठपुरावा व ध्यास सर्जनशील स्त्रीमनांनी स्वीकारला पाहिजे. सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, आनंदीबाई जोशी, रखमाबाई, काशीबाई कानेटकर, पंडिता रमाबाई यांसारख्या थोर स्त्रियांची येथे आठवण येते. आपल्या कवयित्रींचे आदर्श अजूनही कळत नकळतपणे पुरुषी अनुनय व अनुसरण करीत आहे असे वाटते. त्याचप्रमाणे वाढता चंगळवाद जो की पुरुषसत्ताक राजकारणाचे अपत्य आहे त्याचा धोका स्त्रीवादाला आहे.

## निष्कर्ष :

1. मल्लिका अमरशेख यांचा वाळूचा प्रियकर हा काव्यसंग्रह स्त्रीवादी जाणिवांच्या दृष्टीने एक मोक्याचा टप्पा आहे.
2. 'वाळूचा प्रियकर' ही प्रतिमा पारंपरिक स्त्रीमनातील पुरुषप्रतिमेचा अंत करणारी एक सूचक प्रतिमा आहे.
3. स्त्रीवादाला एक विद्रोही, आक्रमक अशी बाजू आहे त्याचप्रमाणे समानतेच्या व न्याय्यतेच्या पातळीवरील पुरुष स्वीकाराची दुसरी विधायक बाजूही आहे.
4. स्त्रीवादी परिवर्तनाचा रथ स्त्रीलक्ष्यी काव्य व त्याची स्त्रीवादी मीमांसा या दोन चाकांवरच गती घेईल.

## संदर्भ :

1. गणोरकर, प्रभा व इतर, संपा., स्त्रीवादी समीक्षा, वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, ग. रा. भटकळ फाउंडेशन, मुंबई, 2001, पृ. 359
2. दडकर, जया व इतर संपा., रचनाबंधांची विविधता, संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश, आरंभापासून 1920 पर्यंतचा कालखंड, जी. आर. भटकळ फाउंडेशन, मुंबई 2003, दुसरी आवृत्ती, पृ. सदुसष्ट
3. सबाने अरुणा, कवितेचे आत्मभान आणि विश्वभान, आकांक्षा, दै. तरुण भारत, दि. 14–07–2017, पृ. 3

## संदर्भग्रंथ :

1 कुलकर्णी, श्रीधर रंगनाथ, ओवी ते लावणी, प्राचीन मराठी पदबंधची संगीत प्रेरणा आणि परंपरा, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे 1992
2. पंडित भ. श्री., काव्य, मराठी वाङ्मयाचा इतिहास, 4 था खंड मसाप पुणे 1973

□□□

**Published at:**
GIMRJ, Special Isssue – Swatantrydin Visheshank, Ed. by Dr. Pavan Mandavkar, 15 Aug. 2017, ISSN 2394-8426, pp. 38-44
**Available at SSRN:** https://ssrn.com/abstract=3637362